Io

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** अहमदनगर **P.S.(ठाणे):** कोतवाली

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 1457 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 01/12/2023 22:25

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 01/12/2023
**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 01/12/2023
**Time From (वेळेपासून):** 11:24 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:26 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 01/12/2023 **Time (वेळ):** 22:21 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 050

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/12/2023 22:18 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** सार्वजनिक बांधकाम विभाग दक्षिण, जिल्हा परिशद कार्यालय,अहमदनगर येथे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सौ. राणी विजय आव्हाड

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1990

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | ग्रामपंचायत जाभंळी, रा जांभळी,पाथर्डी, जि अहमदनगर,कोतवाली, अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | ग्रामपंचायत जाभंळी, रा जांभळी,पाथर्डी, जि अहमदनगर,कोतवाली, अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संतोश बाळासाहेब जाधव | | | 1. विद्या कॉलनी पावन म्हसोबा, नगर कल्याण रोड अनगर , कोतवाली,अहमदनगर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 22,500/ रुपये | 22,500.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

22,500.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी सौ. राणी विजय आव्हाड, वय 33 वर्षे, धंदा सरपंच, ग्रामपंचायत जाभंळी, रा. जांभळी, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो.नं. 7770066844

समक्ष हजर राहुन फिर्याद लिहुन देते की, मी वरील पत्यावर कुटुंबासह राहण्यास असुन मी दि .30/11/2023 रोजी पोलीस उप अधीक्षक श्री.लोखंडे यांना फोन करुन एका लोकसेवकाकडुन लाच मागणी होत असले बाबत तक्रार सांगितली. त्यानुसार त्यांनी मला दि. 01/12/2023 रोजी 10/00 वा चे सुमारास अहमदनगर येथे सुरक्षित ठिकाणी थांबण्यास सांगितले. त्यानुसार दिनांक 01/12/2023 रोजी सकाळी 10/00 वा. दरम्यान मी व माझे पती विजय आव्हाड दोघेजन थांबलो त्या ठिकाणी पोलीस उप अधीक्षक श्री. लोखंडे व पोलीस निरीक्षक आर.बी. आल्हाट हे त्यांचे षासकिय वाहनाने तेथे आले. त्यांनी मला माझे नाव गाव विचारले तसेच त्यांची, त्यांच्या सोबतचे स्टाफ व दोन पंच यांची ओळख सांगितली. त्यानंतर मी व माझे पती विजय दोघे श्री. लोखंडे यांचे सुचने वरुन षासकीय वाहनात बसलो व दोन षासकिय पंचासमक्ष लोकसेवकांविरूध्द लाचमागणीची तक्रार सांगितली की, '' मी वरील ठिकाणी कुटुंबासह राहण्यास आहे. मी सन 2021 पासुन जांभळी गावचे सरपंच पदाचे काम पाहते. आमचे जांभळीगासाठी आमदार निधीमधुन नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांचे कडील आदेष क्र. आस्थाविका/203-24/ अंप/ससंअ-5/ 1439 दि.16/06/2023 अन्वये 15,00,000/- रुपये मंजुर झालेले आहेत. सदर कामास नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर यांचे कडील आदेष क्र. जिनिस/0/2023/SEP/AAO/052912 दि.29/09/2023 अन्वये प्रषासकीय मान्यता देवुन सदर कामाची वर्क आर्डर देण्याकरीता मा. कार्यकारी अभियंता, जिल्हा परिशद, सार्वजनिक बांधकाम दक्षिण विभाग अहमदनगर यांचे कडे सादर केलेले आहे. सदर सभामंडपाचे काम 15,00,000/- रुपयांचे असल्यामुळे सदर कामाचे टेंडर आमचे जांभळी गावचे ग्रामपंचायतीने जिल्हा परिशद, सार्वजनिक बांधकाम दक्षिण विभाग अहमदनगर येथे भरलेले आहे. अदयाप पावेतो सदर कामाची वर्क ऑर्डर जिल्हा परिशद अहमदनगर यांचे कडुन ग्रामपंचायतीस मिळालेली नाही. वर्क ऑर्डर मिळणे करीता आमचे जांभळी गावचे ग्रामसेवक श्री. ढाकणे यांनी जिल्हा परिशद अहमदनगर येथे जावुन चौकषी केली असता, सभामंडपाचे कामची फाईल हि जिल्हा परिशदेतील लिपीक जाधव यांचेकडे असले बाबत त्यांना समजल्याने त्यांनी लिपीक श्री. जाधव साहेब यांची भेट घेतली होती. त्यावेळी लिपीक जाधव यांनी ग्रामसेवक ढाकणे यांना सदर कामाची वर्क ऑर्डर पाहिजे असल्यास मंजुर झालेल्या रकमेच्या दिड टक्के रकमेप्रमाणे 23,000/- रुपयांची मागणी केली असुन वर्क ऑर्डर संदर्भात भेटण्यासाठी आपणास बोलविले आहे असे सांगितले''. त्यानंतर माझे लक्षात आले की लिपिक जाधव हे वर्क ऑर्डर काढण्याकरीता लाचेची मागणी करत आहेत. सभामंडपाचे बांधकाम हे गावचे सार्वजनिक काम असल्यामुळे मला लिपीक श्री. जाधव यांना लाच देण्याची इच्छा नाही.

आज मी व माझे पती असे दोघेजण जिल्हा परिशद अहमदनर येथील सार्वजनिक बांधकाम विभाग येथे सभामंडपाचे कामासंदर्भात लिपीक जाधव यांची भेट घेणार आहे. मी महिला असल्यामुळे वर्क ऑर्डर संदर्भात लिपीक जाधव हे माझे सोबत जास्त बोलणार नाहित असे मला वाटत असल्यामुळे मी, माझे पती श्री. विजय बाबुराव आव्हाड यांना सोबत घेवुन जाणार आहे. आमचे भेटी दरम्यान लिपीक जाधव यांचे सोबत आमच्या जांभळी गावचे सभामंडपाचे कामाची वर्क ऑर्डर संदर्भात चर्चा करणार आहे. भेटी दरम्यान लिपीक जाधव यांनी मला अगर माझे पती श्री. विजय आव्हाड यांचेकडे वर्क ऑर्डर काढण्यासाठी लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर योग्यती करावाई करावी. अषी तक्रार सांगितली. त्यावेळी श्री. लोखंडे यांचे सुचनेवरुन सदरची तक्रार मी स्वहस्ताक्षरात लिहुन दिली. त्यावर मी, दोन्ही

पंचांनी व श्री. लोखंडे यांनी सही केली.
त्यानंतर मी, लिपीक श्री. जाधव यांचे विरूध्द नोंदविलेल्या लाचमागणी तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरले. श्री. लोखंडे व पो.नि. आर. बी. आल्हाट यांनी लाचमागणी पडताळणी कारवाईत व्हाईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवून त्याच्या वापराबाबत माहिती आम्हाला समजावून सांगितली. त्यानंतर पो.उप.अधी. श्री. लोखंडे यांचे सुचनेप्रमाणे पोकॉ कराड यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये एक नवीन मेमरीकार्ड घालून, व्हाईस रेकॉर्डर चालू करून, त्या मेमरीकार्डमध्ये काहीही रेकॉर्ड नसल्याची आमची व दोन्ही पंचाची खात्री करून दिली. त्यानंतर पोकॉ कराड यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करून त्यामध्ये पो.उप.अधी. श्री. लोखंडे, दोन्ही पंच, मी व माझे पती विजय आव्हाड यांनी निवेदन केले. त्यानंतर पो.उप.अधी. श्री. लोखंडे यांनी लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाई बाबत मला, माझे पती व पंच नं. 1 यांना सुचना समजावुन सांगितल्या. त्यानंतर पोकॉ कराड यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो माझे पती विजय आव्हाड यांचे ताब्यात दिला. पो.उप.अधी. श्री.लोखंडे यांनी मला, पती विजय आव्हाड व पंच नं 1 यांचेसह आमचे चारचाकी वाहनाने रवाना केले त्याप्रमाणे आम्ही रवाना झालो. मी, माझे पती विजय आव्हाड व पंच नं. 1 असे सार्वजनिक बांधकाम दक्षिण विभाग, जिल्हा परिशद कार्यालय अहमदनगर येथे जावुन लिपीक जाधव यांची भेट घेतली. लिपीक जाधव यांनी आमचे गावचे सभामंडपाचे कामाचे वर्क ऑर्डर मिळणे संदर्भात चर्चा केली असता, चर्चे दरम्यान जाधव यांनी माझे पतीकडे कामाची वर्क ऑर्डर काढण्यासाठी, मंजुर रकमेच्या दिड टक्के प्रमाणे 23,000/- रुपये लाच मागणी करुन तडजोडी अंती 22,500/- रुपये लाच मागणी केली. त्यावेळी माझे पती यांनी हॉस्पीटलचे काम करुन पैसे घेवुन परत येतो असे म्हणाले. त्यानंतर मी, माझे पती विजय आव्हाड व पंच नं. 1 असे त्याठिकाणाहुन निघुन माझे चारचाकी वाहनातुन सापळा पथक थांबले त्याठिकाणी परत आलो. त्यावेळी पोउपअधी.श्री.लोखंडे यांनी, मला, पंच नं.1, माझे पतीला घडलेल्या हकीकतीबाबत विचारली असता, माझे पती यांनी वरीलप्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर पो.उप.अधी.श्री. लोखंडे यांनी पंचांसमक्ष व्हाईस रेकॉर्डींग मध्ये रेकार्ड झालेले संभाशण ऐकले असता जाधव यांनी वर्क ऑर्डर काढण्यासाठी पतीकडे दिड टक्के प्रमाणे 22,500/- रुपये लाच मागणी केल्याचे निश्पन्न झाले.
त्यानंतर लिपीक जाधव यांचे विरूध्द लाचेचा सापळा लावण्याचे ठरले. लाच रक्कम म्हणुन देण्यासाठी मी माझ्या बचतीतुन 22,500/-रुपये त्यात 500/- रुपये दराच्या 45 भारतीय चलनी नोटा हजर केल्या. पोउपअधी.श्री. लोखंडे यांनी सदर सापळा कारवाईमध्ये अँन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिव्याचा वापर करण्यात येणार असल्याचे सांगुन त्याबाबतचे प्रात्यक्षिक मला व माझे पती विजय आव्हाड यांना करून दाखविण्यात आले. मी हजर केलेल्या नोटांना अँन्थ्रासिन पावडर लावण्यात आली व सदर लाच रक्कम माझे पती विजय जाधव यांचे ताब्यात दिली. पो.उपअधी.श्री. लोखंडे यांनी सापळा कारवाईबाबत मला, पतीला व सापळा पथकास आवष्यक त्या सुचना दिल्या. पोकॉ कराड यांनी व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरी कार्ड टाकले. त्यानंतर पोकॉ कराड यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझे पती विजय यांच्या ताब्यात दिला, मी व पंच क्र. 1 असे आम्हाला आमचे चारचाकी वाहनाने लिपीक जाधव यांनी मागणी केलेली लाच रक्कम देण्यासाठी असे सार्वजनिक बांधकाम दक्षिण विभाग, जिल्हा परिशद कार्यालय अहमदनगर येथे रवाना केले. आमचे पाठोपाठ पो.उपअधी.श्री. लोखंडे, पंच नं. 2 व सापळा पथक असे षासकिय वाहनाने आले. मी व पंच नं. 1 प्रषासकिय इमारतीच्या लिफ्टने तिसÚया मजल्यावरील सार्वजनिक बांधकाम दक्षिण विभाग कार्यालय येथे गेलो. आमचे पाठोपाठ सापळा पथक व पंच नं. 2 असे सदर कार्यालयाजवळ येवुन आजुबाजुस कोणास संषय येणार नाही अषा रितीने सापळा लावुन थांबुन राहिले. त्यानंतर मी, माझे पती विजय आव्हाड व पंच नं. 1 असे सार्वजनिक बांधकाम दक्षिण विभाग जिल्हा परिशद अहमदनगर येथील कार्यालयात गेलो. तेथे कार्यालयातील जाधव हे त्यांचे टेबला जवळ नव्हते. त्यानंतर थोडयाच वेळात लिपिक जाधव हे तेथे आले त्यांचे खुर्चीवर बसले, माझे पती विजय हे समोर बाजुचे खुर्चीवर बसले, त्यांनतर त्यांनी पुन्हा उभे राहुन त्यांनी त्यांचेकडील अँन्थ्रासीन पावडर लावलेली लाच रक्कम त्यांचे समोर धरली असता, श्री. जाधव यांनी ती लाच रक्कम त्यांच्या डाव्या हाताने घेवुन, त्यांचे पॅंटचे डावे बाजुचे खिष्यात ठेवली. त्यानंतर माझे पती यांनी सापळा पथकास लाच स्वीकारल्याचा पुर्वनियोजीत इषारा केला, त्यावेळी सापळा पथकाने लिपीक श्री. जाधव यांना 14/25 वाजेचे सुमारास पकडले. त्यावेळी पो.उपअधी.श्री लोखंडे यांनी त्यांना त्यांचे नाव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव संतोश बाळासाहेब जाधव, वय 39 वर्शे, कनिश्ट सहाय्यक, सार्वजनिक बांधकाम विभाग दक्षिण, जिल्हा परिशद कार्यालय, अहमदनगर, राहणार पावन म्हसोबानगर, विदया का◌ॅलनी, कल्याणरोड, अहमदनगर असे सांगीतले. पो. उपअधी.श्री लोखंडे यांचे सुचने वरुन पंच नं 2 करवी जाधव यांचे ताब्यातुन सदरची लाचेची रक्कम पंच नं.1 यांचे समक्ष ताब्यात घेतली. त्यानंतर पो.उपअधी.श्री लोखंडे, व सापळा पथक यांनी जाधव यांना कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग दक्षिण, जिल्हा परिशद कार्यालय, अहमदनगर य◌ांचे दालनात घेवुन गेले, त्यांचे पाठोपाठ मी, पती विजय आव्हाड देखील त्यांचे कार्यालयात गे◌ेलो, त्याठिकाणी जाधव यांच्या पंचासमक्ष चाचण्या घेण्यात आल्या.

त्यानंतर पंचनाम्याचे पुढील कामकाज लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर कार्यालय येथे करण्याचे ठरले. पो. उपअधी. श्री लोखंडे यांचे सुचनेवरून मी व माझे पती आमच्या चारचाकी वाहनाने व सापळा पथक जाधव यांचेसह शासकिय वाहनाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अ.नगर येथे आलो व त्याठिकाणी सापळा कारवाईचे पुढील कामकाज करण्यात आले.
तरी दि. 01/12/2023 रोजी 11/24 वा. ते 14/26 वा. च्या दरम्यान लाचमागणी पडताळणी व सापळा कारवाईच्या वेळी यातील लोकसेवक संतोश बाळासाहेब जाधव यांनी आमचे जांभळी गावात मंजुर असलेल्या सभामंडपाचे कामाची ग्रामपंचायतीचे नावाने वर्क ऑर्डर काढण्यासाठी, मंजुर रकमेच्या दिड टक्के प्रमाणे 22,500/- रुपये लाचेची मागणी करून, ती लाचेची रक्कम लोकसेवक जाधव यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग दक्षिण, जिल्हा परिशद कार्यालय, अहमदनगर येथे स्विकारुन स्वतःचा संपत्तीक फायदा करून घेवुन गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले म्हणुन माझी लोकसेवक संतोश बाळासाहेब जाधव, वय 39 वर्शे, कनिश्ट सहाय्यक, सार्वजनिक बांधकाम विभाग दक्षिण, जिल्हा परिशद कार्यालय, अहमदनगर, राहणार पावन म्हसोबानगर, विदया कॉलनी, कल्याणरोड, अहमदनगर यांचे विरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.वैगरे म।। चे फिर्यादी वरुन गुन्हा रजि. दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास पोनी आल्हाट लाच लुचपत प्रतिबंध विभाग अहमदनगर हे करित आहेत

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**
chandrashekhar mohankrao yadav(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** chandrashekhar mo
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**

एन. पी. टिपरे
पोलीस ठाणे अंमलदार
कोतवाली पो.ठाणे, अ.नगर